

# आंतरराष्ट्रीय सहकारी वर्ष - २०२५

**श्री. उदय पेंडसे**
बँकिंग तज्ञ

संयुक्त राष्ट्र संघाच्या दि. १९ जून, २०२४ च्या आमसभेत २०२५ हे 'आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष' म्हणून साजरे करण्याचा निर्णय घेतला गेला. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने (International Co-operative Alliance) दिल्ली येथे दि. २५ ते ३० नोव्हेंबर, २०२४ या काळात योजलेल्या जागतिक सहकार परिषदेत तशी रीतसर घोषणा केली व त्याचे बोधचिन्ह प्रकाशित करण्यात आले.

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष घोषित करण्याची ही दुसरी वेळ आहे. प्रथमत: २०१२ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष' म्हणून साजरे केले गेले. आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेने (International Co-operative Alliance) आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ साठी 'सहकाराच्या माध्यमातून उत्तम विश्वाची बांधणी' हे ब्रीदवाक्य निश्चित केले आहे.

संयुक्त राष्ट्र संघाने २०३० सालापर्यंत शाश्वत विकासाची १७ उद्दिष्टे पूर्णत्त्वास नेण्याचे लक्ष्य ठेवले आहे. हे लक्ष्य गाठण्यासाठी सहकार क्षेत्राची भूमिका निश्चितच सहाय्यभूत ठरेल यात शंका नाही. सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी सहकारी क्षेत्राच्या योगदानाला प्रोत्साहन देऊन, आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष साजरे करणे नक्कीच संयुक्तिक ठरणार आहे. संयुक्त राष्ट्र संघाने शाश्वत विकासासाठी कोणती उद्दिष्टे निश्चित केली आहेत, त्याची माहिती थोडक्यात करुन घेऊयात.

**१. गरिबी नष्ट करणे (No Poverty) :** सर्वदूर, सर्व स्तरातून व सर्व प्रकारची गरिबी नष्ट करणे.

**२. भूक मिटवणे (Zero Hunger) :** कोणीही व्यक्ती उपाशी राहता कामा नये, या हेतूने पुरेसा अन्नसाठा करणे, अन्नधान्यातील पोषकता वाढविणे व शाश्वत शेतीसाठी प्रोत्साहन देणे.

**३. चांगले आरोग्य व जीवनमान (Good Health & Well-being) :** सर्व स्तरातील व्यक्तींचे आरोग्य चांगले राहावे. सर्व स्तरांतील व सर्व वयोगटांतील व्यक्तींना चांगले जीवनमान जगता यावे.

**४. दर्जेदार शिक्षण (Quality Education) :** सर्वसमावेशक व दर्जेदार शिक्षण सर्वांना मिळावे. सर्व स्तरांतील व सर्व वयोगटांतील व्यक्तींना शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी. शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे.

**५. लैंगिक समानता (Gender Equality) :** स्त्री-पुरुष हा भेदाभेद नष्ट व्हावा. स्त्री-पुरुष समानता असावी, समान अधिकार असावेत. मुलींना-महिलांना सबल/सक्षम करण्यासाठी प्रयत्न व्हावेत.

**६. स्वच्छ पाणी व स्वच्छता यंत्रणा (Clean Water & Sanitization) :** सर्वांना पिण्यायोग्य स्वच्छ पाणी उपलब्ध व्हावे. त्याचप्रमाणे सर्वदूर – सर्व शहरे तसेच गावातील स्वच्छता यंत्रणा सुसज्ज असावी.

**७. परवडणारी व स्वच्छ ऊर्जा (Affordable & Clean Energy) :** सर्वांना स्वच्छ, अपारंपारिक, आधुनिक व परवडणारी ऊर्जा सतत – अखंडपणे उपलब्ध व्हावी.

**८. रोजगार निर्मिती व आर्थिक विकास (Decent**

**Work & Economic Growth):** शाश्वत व सर्वसमावेशक आर्थिक विकासासाठी प्रोत्साहन देणे. त्याचप्रमाणे सर्वांना रोजगार उपलब्ध व्हावा व उत्पादकता वाढावी यासाठी प्रयत्न करणे.

**९. नावीन्यपूर्ण उद्योग व पायाभूत सुविधा (Industry Innovation & Infrastructure):** सर्वसमावेशक व शाश्वत उद्योग उभारताना त्यात नावीन्य व आधुनिकता आणणे. पायाभूत सुविधा निर्माण करताना संवेदनक्षमता जपणे, त्यामध्ये लवचिकता आणणे.

**१०.असमानता कमी करणे. (Reduce Inequalitites):** देशांमधील व देशांतर्गत असमानता कमी करण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

**११.शाश्वत शहरांची व समुदायांची निर्मिती (Sustainable Cities & Communities):** सर्व समाज घटक गुण्यागोविंदाने व सुरक्षितपणे राहतील अशा शाश्वत शहरांची निर्मिती करणे.

**१२. वस्तूंचे उत्पादन व त्यांचा वापर (Responsible Consumption & Production):** यामध्ये योग्य समतोल साधणारा आकृतीबंध निर्माण करणे.

**१३. वातावरण (Climate Action):** वातावरणात होणाऱ्या प्रतिकूल बदलांची नोंद घेणे व त्यामुळे होणाऱ्या दुष्परिणामांबाबत त्वरित उपाययोजना/कारवाई करणे.

**१४. जलचर प्राण्यांचे जीवन (Life Under Water:** जलचर प्राण्यांच्या जीवाला धोका उत्पन्न न करता समुद्र, समुद्र किनारा, नद्यांचा वापर शाश्वत विकासासाठी करणे.

**१५. वन्यजीव (Life on Land):** पृथ्वीवरील सर्व सजीवांचे रक्षण करणे, वनांचे/जंगलांचे संरक्षण करणे, जमिनीची धूप थांबविण्यासाठी उपाययोजना व जैवविविधतेचा ऱ्हास थांबविणे.

**१६. शांती, न्याय आणि मजबूत संस्था (Peace, Justice & Strong Institution):** शांतीप्रिय समाज घडविण्यासाठी, सर्वसमावेशक शाश्वत विकास व्हावा यासाठी प्रोत्साहन देणे. सर्वांना न्याय मिळण्यासाठी सर्व स्तरांवर निष्पक्ष, जबाबदार संस्थांची निर्मिती करणे.

**१७. उद्दिष्टपूर्तीसाठी भागीदारी (Partnerships for the Goals):** शाश्वत विकासासाठी व निश्चित केलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी जागतिक स्तरावर भागीदारी करणे/सहयोग करणे.

ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेने (International Co-operative Alliance) पुढील मार्गांचा अवलंब करण्याचे योजिले आहे.

- शाश्वत विकासात सहकारी चळवळीच्या सहभागाबाबत जनतेमध्ये जागरूकता निर्माण करणे, तसेच सहकारी क्षेत्राच्या कामकाजास योग्य ती प्रसिद्धी देणे.
- सहकारी चळवळीच्या विकासासाठी व वाढीसाठी माहितीची देवाणघेवाण, आकलन क्षमता वाढीसाठी प्रयत्न आणि सहयोगी संस्थांबरोबर भागीदारी.
- सहकारी उद्योजकीय परिसंस्था मजबूत करण्यासाठी कायदेशीर व धोरणात्मक मार्गदर्शन करणे. प्रोत्साहन देणे, त्याचप्रमाणे व्यवसायास पोषक वातावरण निर्माण करणे.
- तरुणांना सहकार चळवळीत काम करण्यासाठी प्रोत्साहित करणे व चांगल्या विश्वाच्या उभारणीसाठी सहकारी चळवळीची उपयुक्तता सिद्ध करणे.
- उपरोक्त चार संकल्पनांच्या आधारे, संयुक्त राष्ट्र संघाने निश्चित केलेली शाश्वत विकासाची १७ उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी सर्व सहकारी कार्यकर्ते तसेच सहकारी संस्था प्रयत्नशील राहतील व आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष अर्थपूर्ण रितीने साजरे करतील असा विश्वास वाटतो.

******